
# संदीप शांताराम सुर्वे

# परशुराम..

## एक अजेय योद्धा



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

**संदीप शांताराम सुर्वे**

लिखित

# परशुराम..

एक अजेय योद्धा

# परशुराम..

एक अजेय योद्धा

## हे पुस्तक विनामूल्य आहे पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# परशुराम.. एक अजेय योद्धा

लेखक : संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर . .कारवाई होऊ शकते

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

(आपले नाव गांव Whatsapp वर कळवा आणि नियमित ई पुस्तके मिळवा)

प्रकाशन :२६ जुलै २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं विशाल असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक, कधी आध्यात्मिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रत्येक लिखाणाला रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

'ई साहित्य प्रतिष्ठान' द्वारा या पूर्वी माझी 'शोधू कुठे प्रिया', 'एका रात्रीची बायको', 'बाजार', 'फेस ऑफ', 'ओ अमेरिकेचे काका', 'पाच एकांकिका महोत्सव' ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ज्यांना वाचकांनी देखील भरभरुन प्रेम दिले. त्या बद्दल वाचक आणि प्रकाशक दोघांचे आभार.

'परशुराम.. एक अजेय योद्धा' हे पुस्तक देखील आपल्याला नक्कीच आवडेल.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9987311359
Sandeepsurve25@gmail.com

# ओळख

**संदीप शांताराम सुर्वे.**

लेखक – दिग्दर्शक - गीतकार



नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपऱ्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार.

कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या पात्राचा.. त्या कथेचा आनंद

घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी दिलेली दाद मिळते आणि मग अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणाऱ्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, रत्नाकर मतकरी,  सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थानं.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं.. ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या अनेक नाटक, मालिका, वेब सिरिज तसेच चित्रपटांमधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेश वाडकर, अनुप जलोटा, सुदेश भोसले, साधना सरगम, शान, जावेद अली, आनंद शिंदे, नेहा राजपाल, वैशाली सामंत, वैशाली माडे, तृप्ती शाक्या, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, महेश राव, डॉ. राहुल जोशी, पंडीत संजयराज गौरीनंदन अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9987311359

Sandeepsurve25@gmail.com

# अर्पणपत्रिका

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणाऱ्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणाऱ्या

**‘ ई साहित्य प्रतिष्ठान’**

या प्रकाशन संस्थेस
सदर पुस्तक
समर्पित.

संदीप शांताराम सुर्वे.
मुंबई.

# परशुराम... एक अजेय योद्धा..

१ : स्वयंवर

२ : ऋषीपत्नी

३ : अकृतव्रण

४ : व्यभिचारिणी

५ : कामधेनू

६ : संघर्ष

७ : महिष्मती

८ : देहत्याग

९ : ब्रम्हास्त्र

१० : सूड

११ : त्रैलोक्यविजयकवच

१२ : महेंद्रगिरि

# परशुराम... एक अजेय योद्धा..

## १ : स्वयंवर

निळयाशार आकाशाच्या पटलावरुन श्वेत - शांत मेघ मार्गक्रमण करीत आहेत. त्यांच्या छत्रछायेखाली एक अतिशय सुंदर, समृद्ध विस्तीर्ण पसरलेले राज्य दिसत आहे. भागिरथीच्या किनारी राज्याच्या मध्यभागी एक भला मोठा नेत्रसुखदायक असा कलाकुसर युक्त राजवाडा दिसू लागतो. हत्ती, घोडे, पालख्या राजवाड्याच्या दिशेने अगदी लगबगीने चालल्या आहेत.

ईक्ष्वाकू वंशात 'रेणू' या नावाचा महापराक्रमी राजा भागीरथीच्या काठी कान्यकुब्ज शहरी राहून आपला राज्य कारभार पाहात असे. पुत्रप्राप्तीसाठी राजा रेणूने भगवान शंकरांची भक्ती केली. तेव्हा प्रसन्न होऊन शंकरांनी त्यांना एक सर्वगुणसंपन्न अशी मुलगी व नंतर एक मुलगा होईल असा वर दिला.

राजाने अत्री, वसिष्ठ इ. ऋषींना बोलावून यज्ञ आरंभला. पूर्णाहुती झाल्यावर यज्ञातून एक सर्वांगसुंदर कन्या निघाली. रेणू राजाने तिचे नाव प्रेमाने रेणुका असे ठेवले. ही रेणुका म्हणजे पार्वती व कश्यप पत्नी अदिती या दोघींचा अवतार होय.

a

अतिसुंदर व अतिप्रतिभावान राजकुमारी रेणुकाचे आज स्वयंवर होते. राजमहालातील आपल्या दालनात मृगनयनी राजकन्या रेणुका आरश्यासमोर बसुन आपले अप्रतिम सौंदर्य न्याहाळत आहे.

‘स्वतः चीच स्वताला नजर लावून घेणार का गं सखे..?’ म्हणत सखी अनुराधा गालातच हसत राजकुमारी रेणुकाला चिडवत आहे.

राजकन्या रेणुकाच्या स्वयंवरासाठी भागिरथी काठचा राजमहाल आज सजला आहे. विविधरंगी फुलांनी महालाचे खांब सजले आहेत. रत्ने, मोती-माणकांची आरास जागोजागी दिसत आहे. राजकुमारी रेणुका स्वयंवरासाठी आलेले देशोदेशीचे राजपुत्र आपापल्या मानाच्या आसनावर विराजमान झालेले आहेत. राजा रेणू हात जोडून उपस्थितांचे स्वागत करत आहेत. इतक्यात एक सेवक अत्यानंदाने येऊन राजा रेणुला सांगतो.

'महाराज, महर्षी ऋचीक व त्यांचे पुत्र जमदग्नी यांचे आगमन झालेले आहे.'

राजवाड्याच्या भल्या मोठ्या दरवाजातून जणू दिव्यत्वच चेहऱ्यावर सामावलेले, डोळ्यांमधे विलक्षण तेज, बलदंड शरीर, रूद्राक्ष माळा परिधान केलेले दोन तेजस्वी ऋषी राजवाड्याच्या दिशेने येत आहेत. नुकतेच तारूण्यात आलेले 'जमदग्नी' खांद्यावर अडकविलेले धनुष्य सावरीत चालताना क्षत्रिय रुपी वीर पुरुष दिसत आहेत.

इकडे राजवाड्यात कुजबूज सुरु होते की, क्षत्रिय स्वयंवरात एका तपस्व्याचे काय काम..?

राजा रेणू उपस्थितांना समजावणीच्या सुरात नम्रपणे सांगतात.

a

'जमदग्नी यांचे रक्त देखील क्षत्रिय कुलातील आहे. त्यांचे मातुल घराणे क्षत्रिय आहे. राजा गाधी यांच्या..'

त्यांचे बोलणे मधेच तोडत उपस्थित राजे – महाराजे 'अपमान..अपमान ' करीत उठून उभे राहतात.

'क्षत्रिय हा क्षत्रिय असतो.. संपूर्ण क्षत्रिय. हा गोसावडा आमच्यासोबत स्वयंवरात उभा ठाकणार..?' असे म्हणत संतापलेल्या राजपुत्रांनी आपली शस्त्रास्त्रे उपसली.

समोरील दालनातून राजकुमारी रेणुका ते दृश्य श्वास रोखून पाहत होती. तिच्या दोन्ही खांद्यावर हात ठेवून सखी अनुराधा तिला शांत करु पाहत होती आणि अचानक राजपुत्रांच्या हातून असंख्य बाण सुटले. बाणांचा तो पाऊस महालाच्या दारावर आला आणि त्या बाणांनी ते द्वार बंद झाले. राजा रेणू व्यथित झाले.

साक्षात जमदग्नींचा अपमान.. बंद झालेल्या दरवाजाकडे एक दृष्टी टाकीत जमदग्नींनी आपल्या पित्याकडे पाहिले व त्यांना वंदन करुन त्यांनी आपल्या भात्यातून तीन बाण काढून त्याचे दिव्यचक्र त्या दरवाज्याच्या दिशेने सोडले. क्षणार्धात बाणांचा तो जाळेरुपी दरवाजा मोकळा झाला आणि त्यातून दिव्य असे ते दोन्ही तेजोपुरुष आत गेले. सगळे राजपुत्र तलवार उपसुन त्यांच्या दिशेने पुढे येणार.. तोच जमदग्नींनी एका मागोमाग एक असे बाण सोडत त्यांना उभ्या जागीच बंदिस्त केले. त्यांचे ते धनुर्विद्येतील कौशल्य पाहून सारेच अवाक झाले. राजकुमारी रेणुकेने अत्यानंदाने आपल्या सखीला अनुराधेला मिठी मारली. जमदग्नींना प्रथमदर्शनी पाहताच राजकुमारी रेणुकेने त्यांना आपला पती म्हणून स्विकारले होते.

राजकुमारी रेणुकेने आपल्या पित्याच्या साक्षीने फुलांची माळ जमदग्नींच्या गळयात घातली व महात्मा ऋचीकांचे आशिर्वाद घेतले.

a

'पुत्रवती भव. साक्षात नारायण तुझ्या उदरी जन्म घेवो.'

महात्मा  ऋचीकांचे हे शब्द कानावर पडले आणि रेणूकेचा चेहरा खुलला. उपस्थित सारेजण महात्मा ऋचीक व जमदग्नींचा जयजयकार करु लागले. सनईचे सुर वातावरणात पसरले.

# २ : ऋषीपत्नी

राजमहालात राहणारी राजकन्या रेणुका आता ऋषी जमदग्नींच्या आश्रमात आनंदात राहत होती. तिच्या लाडक्या कामधेनुची काळजी ती स्वतः  घेत होती. भल्या पहाटे गाईच्या धारा काढणारी, गोमयामध्ये हात घालून जमीन सारविणारी रेणुका आता ऋषीपत्नी झाली होती. एका पाठोपाठ एक असे चार दिव्य पुत्र माता रेणुकेच्या पोटी जन्माला आले.

महर्षी जमदग्नींचा दिवस भागीरथीच्या तीरावर स्नान संध्या , जप जाप्य उरकुन सुरु होत असे.  वनांतील विविध वनस्पतींच्या औषधी गुणांसंबंधी त्यांचे प्रयोग सुरु होते. तासनतास ते लेखनात गर्क होते. जणू आपल्या कार्याशी ते एकरूप होत होते. रेणुकाही त्यांना पाहत तितकीच तल्लीन होत असे. एका भल्या पहाटे अचानक रेणुका उठून बसली. शांत झोपलेल्या जमदग्नींना तिने उठविले आणि तिने जमदग्नींना आतुरतेने सांगितले.

'मला स्वप्नदृष्टांत झाला.'

'स्वप्नदृष्टांत..?'

चेहर्यावर स्मित हास्य आणीत जमदग्नींनी विचारले..

'साक्षात भगवान नारायण माझ्या स्वप्नात आले होते आणि म्हणाले, मी तुझ्या उदरी जन्म घेणार आहे.' हे सांगताना रेणुकेचे डोळे आनंदाने चमकत होते.

ते पाहून जमदग्नी यांना हसू फुटले. लाडिकपणे रागावत रेणुका रुसुन दुसऱ्या दिशेला वळाली. हळूच तिच्या कानाजवळ आपले ओठ नेत जमदग्नी म्हणाले,

a

’हे तर विधिलिखित आहे.’

जमदग्नींचे हे शब्द कानी पडताच तितक्याच वेगाने रेणुकेने वळून आपल्या पतीकडे पाहिले.

' इंद्रदेवांनी जेव्हा मला कामधेनू रुपी प्रसाद दिला होता तेव्हाच दैदिप्यमान आणि साक्षात नारायणाचा अंश असलेला पराक्रमी पुत्र या भृगुकुलामधे जन्म घेणार आहे व त्याचे पितृत्व तुला स्विकारावे लागेल असा आशिर्वाद देखील दिला होता. तेच शब्द पिताश्रींच्या मुखाने आपल्या लग्न समारंभात देखील आशीर्वाद स्वरुप उमटले होते.'

'याचा अर्थ माझा स्वप्न दृष्टांत सत्य होणार..?'

'अर्थातच..' म्हणत जमदग्नी पुन्हा हसले.

वैशाख शुद्ध तृतीया... रेणुकेला आज खूप अस्वस्थ वाटत होते. आकाशाकडे पाहत जमदग्नी यांनी भक्तिभावे नमस्कार केला. ‘नमो नारायण..’

ऋषी आश्रमातील त्या पर्णकुटी वर नाजुक सुगंधी फुलांचा सडा पडू लागला. पृथ्वीतलावर चारही दिशेला शंखानाद घुमू लागला. आकाशातून एक तेजस्वी गोल आश्रमाच्या दिशेने झेपावला. पर्णकुटीतून लहान बालकाच्या रडण्याचा आवाज आला आणि बाहेर उभे असलेले चारही रेणूकापुत्र रुमण्वत, सुषेण, वसु , विश्वावसु तसेच इतर ऋषीसेवक देखील आनंदाने नाचू लागले.

रेणुका मातेच्या पदराआड स्तनपान करणाऱ्या गोड बाळाने पदर बाजुला सारत बाहेर पाहिले. त्याची सारी जेष्ठ भावंडे जणू त्याच्या मुख दर्शनाचीच वाट पाहत होती. आश्रमाबाहेर जमदग्नी आपले पिता ऋचीक यांचे सोबत चर्चा करीत होते.

“नारायणाचा अंश जन्माला आला आहे. त्याचे नाव... राम.”

a

ऋचीक यांचे शब्द वार्याच्या वेगाने सर्व दिशांना पसरले. सार्यांच्या तोंडी आता फक्त एकच नाव होते**... ‘ राम..’**

# ३ : अकृतव्रण

दिवस, मास, वर्षे पाहता पाहता उलटली. एका पहाटे हिमालयाच्या रांगांमधून एका बालकाची करुण किंकाळी ऐकू आली. दोन कान त्या दिशेला उभे राहिले. दोन विलक्षण तेज असलेले नेत्र त्या दिशेला रोखून पाहू लागले.

एका गोड गुबगुबीत गोर्यापान चौदा वर्षांच्या बालकाच्या मागे एक अक्राळ विक्राळ वाघ लागला होता. ते बालक जीवाच्या आकांताने पळत होते आणि वाघ त्याला आपल्या भल्या मोठ्या जबड्याने पकडू पाहात होता. रूद्राक्ष माळा बांधलेले दोन्ही बाहू ताठरले. वाघाने त्या बालकावर झेप घेतली आणि अचानक वार्याच्या वेगाने एक परशू आला आणि वाघाचे मुंडके धडापासून वेगळे करुन गेला. जितक्या वेगाने परशू हातातून सुटला होता त्याच वेगाने तो पुन्हा दुसऱ्या हाती येवून स्थिरावला होता.

एक अजेय योद्धा.. समोर उभा होता.

काळा तकतकीत केशसंभार खांद्याच्या खाली रुळत होता. छातीपर्यंत रुळणारी दाढी त्या तेजस्वी चेहऱ्यावर शोभून दिसत होती. दोन्ही दंडांमधे रुद्राक्ष माळा घट्ट रुतुन बसल्या होत्या. बलदंड शरीरयष्टी. गुडघ्यापर्यंत कमरेला व्यवस्थित कसलेले वस्त्र. हातात अर्धचंद्राकृती चमकणारा धारदार परशू. श्वेत हिमालयात त्या योद्ध्याभोवती जणू ब्रम्हांड फिरत होते.

'आपण मला एक नवीन जन्म दिलात. आता आपणच माझे मातापिता. हा आपला पुत्र पुढील संपूर्ण आयुष्य आपल्या सेवेत घालवू इच्छितो.' त्या बालकाने दोन्ही हात जोडीत त्या योद्ध्याच्या पायावर आपले डोके ठेवले.

a

'तुला आता भिण्याचे कोणतेही कारण नाही. व्याघ्राकडून तुला कोणताही व्रण अथवा इजा होण्याअगोदरच माझ्या परशूने त्याचा बळी घेतला. आजपासून तू अकृतव्रण..'

‘आणि आपण..?’

त्याच्या निष्पाप प्रश्नावर हसून ते उत्तरले.

'राम..'

बालक गोड हसला आणि चकाकणाऱ्या परशूकडे पाहत म्हणाला...

“परशु..राम..”

दोघे आश्रमाच्या दिशेने निघाले. वाटेत त्यांना अनेक हिंस्त्र पशू भेटले. त्यांना पाहून अकृतव्रणाची भीतीने गाळण उडत होती. परंतु पशु - पक्षांसोबत सहजतेने गप्पा मारणाऱ्या रामांसोबत हिंस्त्र पशू देखील अगदी पाळीव पशुंसारखे वागत होते.

# ४ : व्यभिचारिणी

रेणुका दररोज भल्या पहाटे उठून मलप्रभा नदीवर स्नानासाठी जात असे. ती हा नित्यक्रम अतिशय निग्रहाने करत असे. ती किनाऱ्यावरील वाळूचे मडके बनवत असे आणि जमदग्नींसाठी त्यात पाणी भरून आणत असे. पाणी मडक्यात भरल्यावर तिथे असलेल्या सापाचे वाटोळे ती आपल्या डोक्यावर ठेवून त्यावर ती मडके ठेवून ती घरी जात असे. जमदग्नी मुनी तिने आणलेल्या मलप्रभा नदीच्या पाण्याने शुचिर्भूत होऊन धार्मिक कर्मे करत असत.

एका भल्या पहाटे नित्य नियमाप्रमाणे रेणुका मलप्रभा नदीवर स्नानास गेली. चंद्रकोर पश्चिमेला खूपच सुंदर दिसत होती. तिचा शांत निळा प्रकाश सगळीकडे पसरला होता. हातातील घडा बाजूला ठेवत ती त्या पाण्यात उतरली. पलिकडुन कसलातरी आवाज येत होता. तिने त्या दिशेला पाहिले. त्या सुंदर चंद्रप्रकाशात गंधर्वराज चित्ररथ आणि काही गंधर्व स्त्रिया पाणी उडवित जलक्रिडा करीत होत्या. मंजुळ स्वरात तंतुवाद्ये वाजवित  मुक्तपणे गात होत्या. त्यांची ती जलक्रिडा रेणुका पाहतच राहिली. तिलाही गंमत वाटत होती.

‘आपल्या पतीसोबत अशी जलक्रिडा आपण केली तर..’ नुसत्या विचारानेच ती पार लाजून गेली होती.

जेव्हा ती भानावर आली तेव्हा तिला झाल्या प्रकाराचा पश्चाताप केला. बराच उशीर झाल्याने स्नान उरकून ती वाळूचे मडके बनवण्याचा प्रयत्न करू लागली. चित्त ढळल्यामुळे ती मडके बनवूच शकली नाही. सापाला पकडण्याचा प्रयत्न करताच साप देखील अदृश्य झाला.

a

चंद्रास्त झाला होता. आकाशात लाली पसरु लागली. रेणुका रिकाम्याहाती आश्रमाच्या दिशेने चालू लागली. आपल्याला उशीर झाला ही भिती तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. तिने अंगणात प्रवेश केला. आश्रमाच्या दारी क्रोधीत चेहऱ्याने तिच्याकडे पाहत असलेल्या जमदग्नींचे तिने पाय धरले.

'दूर हो. पत्नी म्हणून हा अधिकार तू गमावलेला आहेस.'

'आर्य... क्षमा असावी. मी विचारांमधे वाहले परंतु मोहाच्या त्या क्षणी देखील मी आपल्याशिवाय इतर कोणाचाही विचार केला नाही.'

'ऋषि पत्नी असताना जलक्रीडेच्या भोगाची तुला इच्छा झाली, तू व्यभिचारिणी आहेस.'

क्रोधाने लाल झालेल्या जमदग्नींनी आपल्या पुत्रांना त्यांच्या मातेचा वध करण्याचा आदेश दिला. रुमण्वत, सुषेण, वसु, विश्वावसु पितृआज्ञा कशी पाळावी या विवंचनेत होते.

जमदग्नींच्या क्रोधाने तेथे भयाण वादळ उठले होते. वारा बेभान वाहू लागला. पाने, फुले, माती चारही दिशेला उडत होती. पक्षांच्या चित्काराने आसमंत दणाणले होते. त्याचवेळी परशुधारी परशुराम तेथे पोहोचले. पितृआज्ञा झाली.

'रामा, तुझ्या सर्व भावांनी पितृआज्ञेचे उल्लंघन केले आहे. तू माझी आज्ञा पाळशील याची मला खात्री आहे. या पापिणीचा वध कर. तुझ्या या मार्गात येणाऱ्या प्रत्येकाला या पृथ्वीतलावरुन नाहीसे कर.'

परशुरामांनी पितृआज्ञा पाळत आपल्या मातेच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आणि त्यांचे चारही भाऊ रुमण्वत, सुषेण, वसु , विश्वावसु माता रेणुकेच्या पुढे येऊन उभे ठाकले.

a

'अम्ब..अम्ब... मला क्षमा कर.' म्हणत डोळे बंद करून परशुरामांनी परशू फेकला. चारही जेष्ठ भावंडांची मस्तके चिरत परशू माता रेणुकाचे मस्तक चिरून परतला होता. परशुरामांच्या डोळ्यांतुन आसवे ओघळत होती. समोर त्यांची प्रिय माता व भावंडे निपचिप पडली होती. जमदग्नींचा राग आता शांत झाला होता.

'रामा, तुझ्या पितृसेवेने मी संतुष्ट झालो आहे. काय हवे ते माग.'

क्षणाचाही विलंब न करता परशुराम म्हणाले...

'तात माझी माता आणि माझे प्रिय बंधु मला परत मिळावेत आणि झाल्या प्रकाराचे त्यांना विस्मरण व्हावे. मला मातृहत्येच्या पापातून मुक्तता मिळावी तात.'

निपचिप पडलेल्या आपल्या परिवाराकडे पाहत जमदग्नींनी डोळे मिटले. पश्च्याताप त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. मंन्त्रोच्चारण करत कमंडलू मधले पाणी त्यांनी शिंपडले आणि स्वप्नातून बाहेर यावे तसे सारे उठून उभे राहीले आणि त्यांना बिलगून परशुरामांनी आपल्या आसवांना मोकळी वाट करून दिली.

# ५ : कामधेनू

उग्र तपस्या करुन आता जमदग्नींनी क्रोधाला जिंकले होते. दुसरीकडे महिष्मती नगरीच्या भव्य राज प्रासादात सम्राट कार्तवीर्य म्हणजेच सहस्त्रार्जुन अस्वस्थपणे फेऱ्या घालीत होता. गर्गमुनी त्याला भेटायला आले होते.

'नमस्कार गुरुवर्य'

राजाने त्यांचे स्वागत केले.

'काही खास प्रयोजन येण्याचे...?'

राजाच्या प्रश्नाचे मुनीवर उत्तर देऊ लागले.

'आज विश्वावसूची भेट झाली.'

'विश्वावसू...?'

'जमदग्नी पुत्र. गेले काही दिवस हैहय सैनिक आश्रमात येऊन त्रास देत आहेत. उग्र तप साधनेने जमदग्नींनी क्रोधावर विजय मिळविला आहे. अन्यथा... '

'अन्यथा...? मुनीवर आम्ही सम्राट कार्तवीर्य आहोत अर्थात सहस्त्रार्जुन. भार्गव आमचा सामना करणार..?'

राज दरबारात एक विकल हास्य गुंजले.

'मुनीवर, माझे सैनिक माझ्या आज्ञेचे पालन करीत होते.'

'राजन...?'

'हो गुरुवर्य. कामधेनू.... इच्छापूर्ती करणारी कामधेनू. जे एक अलौकिक रत्न आहे. आणि रत्नांचा भोक्ता राजा असावा. ऋषी नव्हे.'

'राजन, कामधेनू हा इंद्राचा प्रसाद आहे. विनाशाकडे नेणारा हा विचार सोडून दे.'

सचिव चंद्रगुप्त युक्तीवादाने म्हणाला, 'तसे राजा हा तर पृथ्वीचा स्वामी.. मग कामधेनू.. राजप्रासादी असली काय किंवा आश्रमात असली काय.'

'मग तिला आश्रमातच राहू दे.. विनाशकाले विपरीत बुद्धी.. ' म्हणत गर्गमुनी राजप्रासादातून बाहेर पडले.''

सम्राट कार्तवीर्याला हा आपला अपमान वाटला. गर्गमुनी गेल्या दिशेकडे पाहताना  सम्राट कार्तवीर्याचे डोळे रागाने लाल होऊ लागले. राजमहालाच्या द्वाराकडे रागाने पाहणाऱ्या सम्राटाच्या मनात काय चालले आहे ते त्याच्या चाणाक्ष सचिव चंद्रगुप्ताने अचूक ओळखले.

आकाशात धुळींचे लोट उठले. सम्राट कार्तवीर्य आपल्या असंख्य सैनिकांसह गरुडरुपी रथावर आरुढ होऊन सचिव चंद्रगुप्त सहित जमदग्नींच्या आश्रमात पोहोचला.

महर्षी जमदग्नी, रेणुकामाता व ऋषी पुत्रांनी सम्राटाचे आदरातिथ्य केले. त्यांना उपहार स्वरुप उंची वस्त्रे आणि अलंकार एका तबकातून देण्यात आले. ते पाहून सम्राट कार्तवीर्याच्या भुवया उंचावल्या गेल्या.

'अतिथी देवो भव...! या मौल्यवान उपहारांऐवजी जर आम्ही आपणांकडे कामधेनू मागितली तर...?'

a

सम्राट कार्तवीर्याचे हे उदगार ऐकून काय बोलावे कुणालाच काही सुचेना. सम्राट न राहवून कामधेनू पाशी गेला. तिला स्पर्श करायला जाताच ती सरळ जमदग्नींजवळ जाऊन त्यांचे हात चाटू लागली. चंद्रगुप्ताने आपल्या सैनिकांना खुणावले.

'वत्से, तुझे रक्षण तूच कर..'

जमदग्नींचे हे शब्द ऐकताच तिला पकडायला आलेल्या सैनिकांना तिने सळो की पळो करुन सोडले. चंद्रगुप्ताला शिंगांवर मिरवित तिने आश्रमाला एक प्रदक्षिणा घालून त्याला एका विशाल वृक्षावर फेकून दिले.

'सहस्त्र बाहुंचे बळ ज्याला प्राप्त आहे अश्या ह्या सहस्त्रार्जुनाने नर्मदातीरी असलेल्या नागलोकाचा नायनाट केला. सर्वशक्तिमान अश्या लंकाधिपति रावणाला ज्याने नमविले अश्या या सम्राट कार्तवीर्यासोबत कामधेनू असे मैदानी खेळ खेळणार का.?'

असे गर्वाने म्हणत त्याने आपल्या मंत्र शक्तीने एक दोरखंड कामधेनूच्या दिशेला फेकला आणि आपल्या विराट रथाला बांधून तो तिला खेचत घेऊन गेला. सारेजण जमदग्नींना विनविण्या करीत होते परंतु ते मात्र शांत चेहऱ्याने कामधेनू गेल्या दिशेला पाहत होते.

# ६ : संघर्ष

सूर्य मावळतीला चालला होता. परशुराम व अकृतव्रण  आश्रमात आले. समोरील दृश्य पाहून ते दोघे ही स्तब्ध झाले. ऋषी आश्रमाची धुळधाण झाली होती. पडलेली पर्णकुटी, झाडे - झुडुपे, पाला - पाचोळा सारे ऋषी सेवक ते आवरण्याचा प्रयत्न करीत होते.

महर्षी जमदग्नी एका वृक्षाखाली डोळे मिटून शांत बसले होते. कामधेनू जागेवर दिसत नव्हती. माता रेणुका कामधेनू गेलेल्या दिशेला भरल्या डोळयांनी पाहत होती. हे दृश्य पाहून परशुरामांचे डोळे रागाने लाल होऊ लागले.

तेथे घडलेली घटना विश्वावसूकडून कळल्यावर परशुरामांची परशुवरील मूठ भयंकर क्रोधाने आवळली गेली. ते तडक तेथून निघाले. सोबतीला त्यांचे चारही भाऊ आणि त्यांचा मानसपुत्र अकृतव्रण देखील होताच.

महिष्मती राज्याला आता परशुरामांच्या क्रोधाचा सामना करावा लागणार होता. महिष्मती राज्याच्या दिशेने परशुरामांची पावले वायुवेगाने चालत होती. प्रत्येक पावलासोबत एक नवीन वादळ निर्माण होत होते. परशुरामांच्या क्रोधाला काही प्रमाणात आवर घालणे जरुरीचे होते अन्यथा संपूर्ण महिष्मती नगरीचा विनाश अटळ होता.

मार्कंडेय ऋषी त्याच वनमार्गात तपश्चर्येला बसले होते. परशुराम व इतर जमदग्नी पुत्रांनी त्यांची भेट घेतली व त्यांचे आशिर्वाद घेतले.

'राजाचा धर्म प्रजापालन, पण येथे उन्मत्त झालेला राजा आपला धर्म विसरला आहे. जो राजा आपल्या प्रजेचे शोषण करतो त्याला शिक्षा करणे गरजेचे

असते. संयमी तपस्वींसाठी संघर्ष हा अंतिम शब्द पण अटळ असेल तर तो जरुर करावा.'

मार्कंडेय ऋषींनी दिलेले हे मार्गदर्शन घेऊन परशुराम निघाले.

अकृतव्रण व सारे जेष्ठ बंधु पुढे चालत होते व त्यांच्या मागे परशू खांद्यावर टाकून राम चालले होते. चंद्राच्या शांत निळसर प्रकाशात त्यांचा तो दिव्य परशू चमकत होता. त्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत हात जोडीत मार्कंडेय ऋषी उद्गारले...,

'नारायणा, आम्ही ओळखले आपल्याला. आपल्याला आशीष देण्याइतके हात मोठे नाहीत हो आमचे. जेव्हा जेव्हा पृथ्वीतलावर अहंकाराचा दानव वाढला.. तेव्हा तेव्हा नारायण नर रुपात पृथ्वीवर प्रकटले. या अवतारात अनेक कार्य तुमच्या हातून घडणार आहेत. हि तर एक सुरुवात आहे. अजून अनेक वादळे यायची बाकी आहेत.'

मार्कंडेय ऋषींच्या डोळयांमध्ये येणाऱ्या काळाची रुपरेषा स्पष्टपणे दिसत होती. अवतार पुरुषांचा जन्म हा संघर्षासाठीच झालेला असतो. सहज जीवन जगताना सकल जनांचा उद्धार कसा होऊ शकेल ? परशुराम अवताराचे कार्य सुरु झाले होते. आकाशातून समस्त देवगण नम्रपणे भगवान परशुरामांसमोर नतमस्तक झाले होते.

a

# ७ : महिष्मती

सारे एका उंच पर्वतकड्यावर पोहोचले होते. एका शिळेवर पाय रोवून राम समोर पाहत होते. त्यांच्या दोन्ही बाजूला त्यांचे सारे बंधु रुमण्वत, सुषेण, वसु , विश्वावसु आणि शिष्य अकृतव्रण उभा होता.

सोसाट्याचा वारा सुटला होता. त्याचा थरकाप उडविणारा आवाज... सगळ्यांची नजर एकाच ठिकाणी येऊन थांबली होती. समोर दूरवर पसरलेले महिष्मती नगरीचे अवर्णनीय सौंदर्य.

तो संगमरवरी राजमहाल. चारही दिशांना मोठाले संगमरवरी पांढरेशुभ्र हत्ती. राजप्रासादाचा कळस नवरत्नांनी मढविलेला. सकाळची सोनेरी सूर्यकिरणे त्या राजप्रासादाच्या सौंदर्यात अधिक भर घालीत होती.

'राजप्रासादाचे कळस गगनाला भिडलेले आहेत परंतु आत राहणाऱ्या सम्राटाचे मन मात्र तितकेच क्षुल्लक.' अकृतव्रण रागानेच पुटपुटला.

' सम्राटांना अजून एक संधी द्यावी. अकृतव्रण...'

परशुरामांचे हे उदगार ऐकून अकृतव्रण आश्चर्यचकित झाला.

'गुरुदेव..?'

'आमचा निरोप आजच सम्राटाच्या कानी पडु दे.'

'सरळ भाषा समजेल का त्यांना..?' वसुच्या या प्रश्नावर राम नुसतेच हसले.

'सरळ भाषा नसेल समजत तर मला.. बऱ्याच अन्य मार्गी भाषाज्ञान गुरुदेवांकडुन प्राप्त झालेले आहे. जरुर भासल्यास एक गुरुकुलच स्थापन करुन येईन सम्राटांच्या नगरीत.'

अकृतव्रणाच्या या बोलण्याने मात्र सगळेच खळखळून हसू लागले.

महिष्मती नगरीत अकृतव्रण निर्भयपणे फिरत राजप्रासादाजवळ पोहोचला. मुख्य प्रवेशद्वारी हैह्यांचा ध्वज फडकत होता. अश्वारुढ हैहेय सैनिक शिस्तीत उभे होते. प्रवेश द्वारावर रत्नजडीत रेशमी तोरणे झळकत होती. अकृतव्रण सगळ्या गोष्टी बारकाईने पाहत होता.

अचानक त्याच्यासमोर कुणीतरी आले म्हणून त्याने वर पाहिले तर जवळजवळ सात फुटांचा हैहेय सैनिक.. अकृतव्रणापेक्षा जवळ जवळ दोन फुट उंच. सैनिक त्याच्याकडे रोखून पाहत होता. त्याला किंचितही न घाबरता अकृतव्रणाने भुवया उडविल्या आणि तो आपला मार्ग बदलून चालू लागला.

पुन्हा समोर तसाच एक दुसरा बलदंड हैहेय सैनिक अकृतव्रणाची वाट रोखून. आता मात्र अकृतव्रणाचा पारा चढला. परशुरामांच्या शौर्याची पुरेपुर कल्पना असलेला अकृतव्रण... भय हा शब्द आता त्याच्या आसपासदेखील फिरकत नव्हता.

'कोण तू....?'

'मानव. दोन पायांचा मानव. शरीर वाढले तेव्हा दृष्टी कमी झाली का तुझी..?'

'खूपच मस्ती आहे रे तुझ्यामधे. माझ्या एका प्रहाराने जमीनदोस्त होशील.'

'एका ब्राम्हणाला भयभीत करु पाहतोस..? माझ्या गुरुदेवांना जर तुझा हा मस्तवालपणा कळाला ना.. तर मग पळता भुई थोडी होईल तुला. जा.. तो दंडुका पकडून दरवाजावर उभा रहा. म्हणे एका प्रहाराने.. कळेल लवकरच प्रहार कशाला म्हणतात ते. आपली आवक लक्षात ठेवूनच प्रश्न विचारावेत माणसाने. मी संदेश घेऊन आलोय तुझ्या सम्राटासाठी. तुझ्यासोबत निरर्थक गप्पा झोडायला वेळ नाही मला.'

'तू सम्राटांसाठी संदेश आणला आहेस...? खरं सांग.. दक्षिणेच्या लालसेने आला आहेस ना तू..? थांब आता तुला चौदावे रत्नच दाखवितो. निघ इथून.'

आता या गोंधळाने लोक जमू लागले होते. लोकांची कुजबूज सुरु झाली.

'कोण हा विप्र..? आपल्या नगरीतला तर वाटत नाही.'

'अतिथीधर्म पण राहिला नाही आता या नगरीत.'

गोंगाटाने वरेण्य महाद्वारापाशी पोहोचला.

'कसला गोंधळ सुरु आहे..?'

'महाराज, हा विप्र इथे गोंधळ घालीत आहे. म्हणे सम्राटांना निरोप द्यायचा आहे.'

अकृतव्रण पुढे येऊन म्हणाला,

'मी माझ्या स्वामींचा संदेश घेऊन येथे आलो आहे आणि हा कर्तव्यशून्य द्वारपाल माझ्या कामात अडथळा आणू पाहत आहे.'

' कोण स्वामी तुझा..?'

' मी परशुराम शिष्य.. अकृतव्रण'

a

' काय संदेश आहे..? '

' सम्राट या शब्दाचा अर्थ कळतो का तुम्हाला..?' अकृतव्रणाचे हे शब्द ऐकताच हैहेय सैनिकांनी तलवारी सरसाविल्या.

' आपली पायरी उतरुन खाली येऊ नका. परशुरामांच्या परशुची गाथा अजून पडली नाही बहुतेक तुमच्या कर्णपटलांवर.'

हैहेय सैनिकांनी अकृतव्रणाला बंदिस्त केले. इतक्यात सम्राट कार्तवीर्याची स्वारी तेथे पोहोचली. वरेण्य लगबगीने पुढे झाला. तो काही बोलणार तोच अकृतव्रण सम्राट कार्तवीर्याजवळ जाऊन म्हणाला..

'हे राजन, आपल्या देखत संदेश घेऊन आलेल्या या दूताचा अपमान आपले सैनिक करीत आहेत. हा आपलाही अपमान नाही का..?'

राजाने त्याला सोडून द्यायची खूण करताच.. अकृतव्रण त्या सैनिकांचे हात झटकून पुढे आला आणि कोणतीही तमा न बाळगता तो पुढे म्हणाला .

' मी परशुराम शिष्य.. अकृतव्रण. आपण अनवधनाने नेलेली कामधेनू परत न्यायला आलो आहे. कामधेनूचे हरण करुन आपण महात्मा जमदग्नींचा अपमान केला आहे राजन. अहंकार सोडा अन्यथा माझे स्वामी इच्छा नसताना हाती शस्त्र धारण करतील आणि मग होणाऱ्या विनाशाला हे राजन आपणच जबाबदार असाल.'

अकृतव्रणाच्या तोंडून हे ऐकताच वरेण्याने रागाने आपली तलवार उपसली.

'राजन, संदेश घेऊन आलेल्या दूताला या नगरीत असे बंदिस्त केले जाते.. अशीच आहे का इथली परंपरा..? दूताचा सन्मान करणे हा आर्यधर्म आहे. एका निशस्त्र दूताला देखील सम्राटाचे सैनिक घाबरतात. कमाल आहे बाबा..'

a

असे म्हणत अकृतव्रण तेथून हळूच निघाला. सम्राट कार्तवीर्यासह सारे जण त्या निर्भय परशुराम दूताला जाताना पाहत होते आणि अकृतव्रण मात्र सावकाशपणे कपाळावरील घाम पुसत सुटकेचा दिर्घ श्वास घेत होता.

# ८ : देहत्याग

महिष्मती नगरीच्या राज दरबारात सम्राट कार्तवीर्याची विशेष सभा सुरु झाली. सारे मंत्रिमंडळ अवाक झाले होते.  परशुरामाचा शिष्य येतो काय आणि आपल्याला आव्हान देतो काय. सारेच अनपेक्षित.

आठ प्रहरांमधे परशुरामाला बंदिस्त करुन तुमच्या चरणी नतमस्तक करतो असे म्हणत वरेण्य तेथून निघाला आणि सर्व शक्तीनिशी त्याने परशुरामांवर आक्रमण केले पण परशुरामांनी खरेच त्याला पळता भुई थोडी केली. पराक्रमी वरेण्य व त्याचा पुत्र वृत्रतेजस दोघेही युद्धात मारले गेले. सैनिक भयाकुल अवस्थेत सैरावैरा धावू लागले.

' जमदग्नी पुत्र परशुरामाने आपल्यावर युद्ध लादले आहे, त्याला उत्तर देणे आता गरजेचे आहे..'

म्हणत कार्तवीर्य महाराणी मनोरमाच्या दालनातून  निघून गेला. दूर अस्ताला जात असलेल्या सूर्याकडे पाहत महाराणी मनोरमा आपल्या सखी सागरिकेसोबत आपले मन मोकळे करु लागली.

' साक्षात इंद्रदेवाचा प्रसाद असलेल्या कामधेनूचे महर्षी जमदग्नींकडून हरण करुन महाराजांनी फार मोठे पाप केले आहे. त्यांना जमदग्नी पुत्र भगवान परशुरामांच्या क्रोधापासून कोण वाचवेल..? सखी सागरिका..., कामधेनू परत न करता महाराजांनी संघर्ष केला तर मला देखील देहत्याग करावा लागेल.'

a

महाराणी मनोरमाच्या तोंडून 'देहत्याग करावा लागेल..' हे ऐकून सखी सागरिकाच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. मानेने नाही म्हणत तिने आपल्या प्रिय राणी समोर हात जोडले.

परशुरामांच्या अतीव पराक्रमाने कार्तवीर्याचा संताप अजून वाढत होता. महीष्मतीची सेना सज्ज झाली. कार्तवीर्याने रणांगणावर जायची तयारी केली. आपली प्रिय पत्नी महाराणी मनोरमा आज पंचारती घेऊन समोर आली नाही.

कार्तवीर्याने आपल्या शयनकक्षाकडे नजर टाकली. राजाचा इशारा ध्यानी येऊन सागरिका धावतच आत गेली. राणी मनोरमा तेथे नव्हती. सागरिकेच्या मनामध्ये शंकेची पाल चुकचुकली. ती धावतच पूजा गृहाच्या दिशेने धावत सुटली.

राज महालातील पूजा गृहामधे देवासमोर अखंड ज्योत जळत होती. तिचा प्रकाश सभोवती पसरला होता. महाराणी मनोरमाने आपले मस्तक देवासमोर टेकविले होते. महाराणी मनोरमाच्या काळ्याभोर सुंदर रेशमी केशकुंतलांनी तिचा सुंदर चेहरा झाकला गेला होता. सागरिका राणी जवळ आली आणि तिने महाराणी मनोरमाला स्पर्श करताच महाराणी मनोरमाचे मृत शरीर सागरिकेवर कोसळले. ती मोठ्याने किंचाळली.

# ९ : ब्रम्हास्त्र

आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्युने सम्राट कार्तवीर्य अधिक क्रोधाने भरला होता. आता त्याला फक्त परशुरामाचा विनाश हवा होता.

'आपली समस्त सेना घेऊन परशुरामावर आक्रमण करा. महाराणींचे अंत्यविधी उरकून मी देखील युद्धभूमीत येतो.'

असे सांगत कार्तवीर्याने सेनापती अजेयाक्षला युद्धभूमीत धाडले. धुळीचे वादळ, प्रचंड शंखध्वनी, नगार्यांचा धीर गंभीर नाद, ध्वज हाती घेतलेले हजारोंच्या संखेने अश्वावर आरुढ झालेले सैनिक, महाकाय हत्तीवरील अंबारीत विराजमान झालेले अधिकारी. असंख्य पायदळ आक्रमणासाठी सज्ज होते.

नर्मदेच्या पूर्वेला परशुराम.. आपण स्वतःहून आक्रमण करायचे नाही. हा त्यांचा निश्चय. विरोधी सेनेत सेनापती अजेयाक्ष खूपच अस्वस्थ. परशुरामांच्या अतुल पराक्रमाची गाथा त्याने ऐकलेली. सम्राट आले की एकत्रितपणे आक्रमण केल्यास आपली ताकद अधिक असेल हा त्याचा क्षणिक विश्वास...

युद्धभूमीवर शंख फुंकले गेले. सम्राट कार्तवीर्य आणि सेनापती अजेयाक्ष यांनी एकत्रितपणे भगवान परशुरामांवर आक्रमण केले परंतु संपूर्ण हैहेय सैन्याची धूळधाण उडाली.

कार्तवीर्याचा सारथी चांद्रसेन याचा रामाच्या हातील तळपणारा परशू पाहुनच थरकाप उडाला. घनघोर युद्ध झाले. महीष्मतीचे हैहेय सैनिक व भार्गव एकमेकांवर तुटुन पडले होते. परशुराम आपल्या परशूने रक्ताची नदी वाहवत होते. कार्तवीर्य व परशुराम एकमेकांसमोर उभे ठाकले. शस्त्र व अस्त्रांचा मारा सुरु होता.

a

शेवटी सम्राट कार्तवीर्याने भगवान दत्तात्रयांचे स्मरण करुन परशुरामांवर ब्रम्हास्त्र सोडले.

ढगांचा प्रचंड गडगडाट झाला. सारे जागीच थांबले. प्रचंड वादळ सुटले. मातीचा लोट उसळला. कार्तवीर्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. वादळ शांत झाले. कार्तवीर्याने समोर पाहीले परशुराम भूमीवर पद्मासन घालून बसले होते. त्यांच्याभोवती एक तेजोवलय फिरत होते. ते फिरते ब्रम्हास्त्र हळुहळू आकाशात विलीन झाले. सम्राट कार्तवीर्याचा अहंकार संपला होता.

भगवान दत्तात्रय साक्षात प्रकट झाले..

' हे राजन, जगाच्या कल्याणासाठी दिलेले ब्रम्हास्त्र तू अहंकाराने सोडलेस. आता हाच अहंकार तुझ्या विनाशाला कारणीभूत ठरला आहे.'

परशुरामांनी आपले दोन्ही बलदंड हात आकाशाकडे उंचावून सूर्य देवतेकडे पाहत डोळे मिटले. खांद्यावरील परशू त्यांनी मुठीमधे पकडून कार्तवीर्याच्या दिशेने भिरकाविला. विजेने काळोखी रात्र चिरत जावी तसे तो दिव्य परशू कार्तवीर्याच्या छातीवर जावून आदळला.

कार्तवीर्याच्या रथासकट त्याच्या देहाचा चक्काचूर झाला आणि ते पाहून त्याचे सैन्य सैरावैरा पळू लागले. परशुरामांच्या परशुची कानाने ऐकलेली गाथा आता प्रत्येकाने अनुभवली होती.

साक्षात सहस्त्रार्जुनाचा पराभव झाला होता. परशुरामांच्या परशुने एका महाबलाढ्य सम्राटाचा अहंकार धुळीला मिळवला होता. महीष्मतीचे महापराक्रमी हैहेय सैनिक दिसेल त्या दिशेला पळत सुटले होते. हा हा म्हणता सम्राटाच्या पराभवाची वार्ता दहा दिशेला पसरली होती.

# १० : सूड

आश्रमात माता रेणुका व ऋषी सेवक आप आपल्या कार्यात मग्न होते. गो शालेतील गाईचे दोहन करताना कामधेनूच्या रिक्त जागी पाहिल्यावर माता रेणुकेला अश्रू अनावर होत होते.

इतक्यात कामधेनुच्या हंबराने माता रेणुका गो शालेतुन लगबगीने बाहेर आली. हिरव्यागार हरीततृणांच्या मखमली गालीच्यावरुन कामधेनू आपल्या गोजीरवाण्या पाडसासह माता रेणुकेच्या दिशेने धावत येत होती. तिच्या मागोमाग भगवान परशुराम, त्यांचे बंधु रुमण्वत, सुषेण, वसु , विश्वावसु आणि शिष्य अकृतव्रण.

माता रेणुकेजवळ येताच कामधेनू प्रेमाने तिचे हात चाटू लागली. तिला कवटाळत रेणुका मातेच्या डोळ्यांतून अश्रूंचा पाट वाहू लागला.

एके दिवशी भल्या पहाटे राम माता पित्याची आज्ञा घेवून तपस्येसाठी अरण्यात गेले. त्यांचे बंधु पित्याच्या आज्ञेनुसार जंगलात वनौषधी आणण्यासाठी गेले होते. अचानक एक अश्वपथक थेट आश्रमात घुसले.

'कुठे आहे तो परशुराम..?' म्हणत त्या राजपुत्रांनी पित्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी हातातील खडगाने जमदग्नींवर वार करण्यास सुरुवात केली. माता रेणुकेने हंबरडा फोडला. त्या आवाजाने ऋषी सेवक धावत आले परंतु कार्तवीर्यपुत्र त्वेषाने सगळ्यांवर तुटुन पडले होते. महात्मा जमदग्नींवर त्यांनी एकवीस वार केले.

गतप्राण झालेल्या जमदग्नींचे पार्थिव त्यांनी लाथेने अंगणाच्या कडेला उडविले होते. मृत्युचे भीषण तांडव तेथे घडले होते. आश्रम उध्वस्थ झाला होता. जनावरे दाही दिशेला सैरावैरा पळत होती. एखादे वादळ येऊन सारे उध्वस्थ करुन जावे तसे घडले होते.

त्या वेळेस भागीरथीमधे परशुराम तपस्या करीत होते. काहीतरी विपरीत घडले असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी डोळे उघडले आणि तत्परतेने ते आश्रमाच्या दिशेने निघाले. अकृतव्रणाला काहीच कळेनासे झाले. तो ही लगोलग आपल्या गुरुदेवांच्या मागोमाग निघाला.

जेव्हा राम आश्रमात पोहोचले तेव्हा ते समोरील दृष्य पाहून त्यांचा आपल्या डोळयांवर विश्वासच बसेना. काही वेळाने रामांचे बंधु देखील आश्रमात पोहोचले.

घायाळ रेणुकामातेने रामाला सांगितले,

' कार्तविर्याचा तू निः पात केलास. तुझ्या या कृत्याने संतापलेल्या कार्तविर्य पुत्रांनी हे कृत्य केले. तुझ्या पित्यावर एकवीस वेळा प्रहार करुन त्यांनी क्रूरतेचा कळस केला.'

‘कुरु निःक्षत्रियाम् महीम् ... सामान्यांवर अन्याय करणाऱ्या क्षत्रियांना तू धडा शिकव. ही धरणी निः क्षत्रिय कर.’

परशुरामांनी कावडीच्या एका पारड्यात आपल्या पित्याचे पार्थिव ठेवले आणि दुसऱ्या पारड्यात मातेला बसविले. कावड आपल्या बलदंड खांद्यावर घेवुन ते सह्याद्रीच्या दक्षिण उतारावर पोहोचले. हातातील परशुने त्यांनी चंदनाची लाकडे तोडली. चिता रचून पित्याचे कलेवर त्यांनी चितेवर ठेवले.

चितेभोवती प्रदक्षिणा घालताना परशुरामांचे पाय जड झाले होते.

‘कुरु निःक्षत्रियाम् महीम् …’ आपल्या मातेचे हे एकच वाक्य परशुरामांच्या कानी पडत होते.

## ११ : त्रैलोक्यविजयकवच

नदीच्या शांत प्रवाहात स्नान करुन परशुराम ध्यानाला बसले. अखंड तपस्या सुरु होती. महादेव प्रकटले.

'परशुरामा, त्रैलोक्य विजय कवच मी तुला प्रदान करीत आहे. जोवर तुझ्या हाती हा दिव्य परशु आणि पाठीवर शिवधनुष्य आहे.. जोवर तू अन्यायाविरोधात उभा आहेस तोवर तुला कुणीही परास्त करु शकणार नाही.'

रामांनी डोळे उघडले. महादेवाला नमस्कार करुन ते आपल्या कार्याला निघाले.

अनेक वर्षांच्या अखंड प्रवासात त्यांनी अनेक उन्मत्त क्षत्रियांची धूळधाण उडवली.

अयोध्यापती दिलीप राजाने त्याच्या राजप्रासादात रामाचे स्वागत केले. महामुनी वशिष्ठ तेथे उपस्थित होते त्यांना विनम्र अभिवादन करुन राम आपले मनोगत व्यक्त करु लागले.

'माझा लढा क्षत्रियांविरोधात नाही. तर अन्याय करणाऱ्या क्षतवृत्तीवर आहे. याच अयोध्येत एक श्रेष्ठ पुरुषोत्तम असा क्षत्रिय जन्म घेईल. साक्षात नारायणाचाच तो अंश असेल.'

हे ऐकताच सम्राट दिलीपाने आपले मस्तक परशुरामाचरणी नत केले.

'कल्याणमस्तु.'

आशिर्वाद देऊन राम निघाले.

अखंड  क्षत्रिय संहार करीत परशुराम मार्गक्रमण करीत होते. ते कुरुक्षेत्री पोहोचले. मातृऋण फिटले. महात्मा ऋचीकांच्या आश्रमात जावून त्यांनी आपले पितामह ऋचीक व सत्यवती मातेच्या पायांवर मस्तक ठेवले.

' केवळ मातृऋण नाही तर या भूमातेचे ऋण देखील तू फेडलेस राम.' ऋचीकांचे हे शब्द ऐकुन रामांना अत्यानंद झाला. विश्वजीत याग संपन्न झाल्यावर सहस्त्र गोधनांचे उदक कश्यप मुनींच्या हाती सोडीत राम म्हणाले.

'क्षत्रियांचा विनाश केल्यानंतर ही सर्व भूमी माझी आहे. अमृत मधुर जलयुक्त नद्यांनी समृद्ध ही भूमी सुजलाम, सुफलाम आहे. अनेक वृक्षांनी येथील अरण्ये समृद्ध आहेत. खनिज द्रव्यांनी संपन्न ही भूमी मी आपल्या चरणी अर्पण करीत आहे.'

‘ ब्राह्मण हा भोक्ता नाही तर दाता देखील असू शकतो’

हे रामांनी दाखवून दिले. महायाग यथासांग पार पडला.

# १२ : महेंद्रगिरि

पितामहांची आज्ञा घेऊन राम दक्षिणेकडे निघाले. उन्मत्त क्षत्रियांचा विनाश करण्यासाठी अस्त्र उचलले असले तरी मानव संहारच होता तो.. या भावनेने त्यांचे मन त्रस्त होते. आपल्या भावना ते आपल्या शिष्याला बोलून दाखवित होते. आता नवनिर्माण करुन याची भरपाई करायची. पर्वतरांगा ओलांडीत दोघे गुरुशिष्य सह्याद्री पर्वतावर पोहोचले.

सागराच्या अपार जलराशी सह्याद्रीच्या पायथ्यालाच धडका देत होत्या. परशुरामांच्या चेहऱ्यावर स्मित फुलले. त्यांनी हात जोडून बलाढ्य सागराकडे विनंती केली.

' हे सागरा, सहस्त्रावधी योजने जागा तुझ्याजवळ आहे. त्यातला काही भाग मला नवभूमी स्थापनेसाठी हवा आहे. तू थोडासा मागे हटलास तर माझे काम होईल.'


फेसाळलेल्या अहंकारी सागराने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

सागरातून एक प्रचंड पर्वतकाय लाट उसळली. परशुरामांना संताप अनावर झाला. त्यांनी धनुष्यावर प्रत्यंच्या ताणली आणि एकामागोमाग एक असे आग ओकणारे चौदा बाण त्यांनी सागराच्या दिशेने सोडले.

आगीचे प्रचंड लोळ उठले. आसमंत, धरणीला कंप सुटला. सारे भयभीत झाले. काही  क्षणातच सारे काही निवळले. परशुराम शांत उभे होते. भयभीत आदीवासी त्यांच्या मागे येऊन उभे होते.

सागर सह्यगिरीच्या पायथ्यापासून मागे सरकला होता. महेंद्रगिरिच्या पर्वत रांगांवरुन सारे विस्फारल्या डोळ्यांनी खाली पाहत होते. अशी सलग, सपाट, मोकळी भूमी त्यांनी कधी पाहिली नव्हती.


सगळे आनंदाने नाचू लागले होते. महेंद्र पर्वतावर उभ्या त्या तेजपुंज श्री परशुरामांवर समस्त देवी-देवता देवलोकातून पुष्पवृष्टी करीत होते. प्रत्येकाच्या मुखी एकच जयघोष सुरु होता.. ' **जय भगवान परशुराम...**'





# संदीप शांताराम सुर्वे

लिखित आधीची पुस्तके या कव्हरवर क्लिक करताच उघडतील.


एक क्लिक फक्त.







एका रात्रीची बायको
संदीप शांताराम सुर्वे


बाजार..
लेखक
संदीप शांताराम सुर्वे


ओ..
अमेरीकेचे काका...
ओ
अमेरिकेचे
काका..
लेखक
संदीप शांताराम सुर्वे
दोन अंकी क्रेझी कॉमेडी